ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 4 | DEC - 2020

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# आनंदीबाई जोशी यांचे जीवन व कार्य



**रेश्मा मारुती भगत**
**संशोधक इतिहास विभाग , मोहोळ जि. सोलापूर.**
**(M.A.B.Ed) History**
**NET - Qualified**

**प्रस्तावना :-**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात तत्कालीन समाजाच्या स्त्रीविषयक गैर समजुतींना छेद देत आपले कर्तृत्व सिध्द करणारे नाव म्हणजे डॉ. आनंदीबाई जोशी. भारतातील पहिल्या महिला डॉक्टर म्हणजे आनंदीबाई जोशी. ज्यांना त्यांच्या १५३ व्या जयंतीनिमित्त गुगलने खास डुडलव्दारे अभिवादन केले त्या म्हणजे डॉ. आनंदीबाई जोशी.

आनंदी गोपाळ जोशींचे आयुष्य साहसाने आणि संघर्षाने भरलेले असून ह्रदयाला स्पर्श करणारे आहे. त्यांचे व्यक्तिमत्व त्या सर्व महिलाकरता एक प्रेरणास्त्रोत आहे. ज्यांना मोठमोठी स्वप्न पहायला आवडत पण समाजाच्या आणि कुटूंबाच्या भितीने त्या स्वतःला घराच्या चार भिंतीमध्ये कैद करुन घेतात.

आनंदीबाई जोशी यांचे व्यक्तीमत्व महिलांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी १८८६ मध्ये आपले स्वप्न साकार केले. जेंव्हा त्यांनी वैद्यकीय शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. तेंव्हा समाजात त्यांची खूप अवहेलना झाली. एक हिंदू विवाहित स्त्री विदेशी जावून डॉक्टरकीच शिक्षण घेणार ही गोष्ट समाजाला मान्य नव्हती . परंतू आनंदीबाई एक दृढनिश्चयी, जिद्दी स्त्री होती. त्यांनी समाजाच्या या अवहेलनांकडे जराही लक्ष दिले नाही. याच कारणामुळे त्यांना भारतातील पहिली महिला डॉक्टर होण्याचा मान मिळाला. पदवी पूर्ण झाल्यानंतर त्या भारतात आल्या परंतू त्यांना प्रकृतीने साथ दिली नाही. वयाच्या फक्त २२ व्या वर्षीच त्यांचा मृत्यू झाला. हे खरे आहे की ज्या उद्देशाने आनंदीबाईनी डॉक्टरची पदवी घेतली तो उद्देश पूर्ण झाला नाही. परंतू तरही समाजात आजही आनंदीबाईंना मानाचे स्थान आहे.

तो असा काळ होता ज्या काळात स्त्रियाच्याच काय पण पुरुषाच्या शिक्षणाला सुध्दा महत्व दिले जात नसे. महिलांचे शिक्षण म्हणजे तर पापच समजले जात होते. स्त्री शिक्षण हे एखाद्या स्वप्नापेक्षा कमी नव्हते. अशा काळात आनंदीबाईनी आपल्या स्वप्नाला पूर्ण करण्याकरिता विदेशात जावून वैद्यकीय पदवी प्राप्त केली आणि वयाच्या २१ व्या वर्षी १८८६ साली डॉक्टर होवून आपल्या देशाचा गौरवच वाढविला नाही तर सगळयांकरिता एक आदर्श ठरल्या. अशा एक आदर्श, एक प्रेरणस्त्रोत असलेल्या आनंदीबाई जोशी यांचा जीवनवृत्तांत या शोधनिबंधात मांडला आहे.

**उद्देश :-**

१. आनंदीबाई जोशी यांच्या कार्याची माहिती घेणे.
२. आनंदीबाई जोशी यांचा जीवन वृत्तांत पाहणे.
३. आनंदीबाई जोशी यांच्या कार्यातील अडथळयांचा अभ्यास करणे.
४. आजच्या पिढीला त्यांच्या कार्याचे महत्व पटवून देणे.

## डॉ. आनंदीबाई गोपाळराव जोशी :-

### जन्म & विवाह

आनंदीबाई जोशी यांचा जन्म ३१ मार्च १८६५ रोजी पुण्यात त्यांच्या आजोळी एका रुढीपरंपरावादी मराठी कुटूंबात झाला . त्यांचे लग्नाआधीचे नाव यमुना होते. वडिलांचे नाव गणपतराव अमृतेश्वर जोशी. त्या काळात बालविवाहाची प्रथा होती. त्यामुळे वयाच्या नवव्या वर्षीच त्यांचा विवाह वयाने २० वर्षानी मोठे असणाऱ्या गोपाळराव जोशी यांच्याशी झाला . लग्नानंतर गोपाळरावानी आपल्या पत्नीचे यमूना हे

नाव बदलून आनंदीबाई असे ठेवले. गोपाळराव जोशी हे मूळचे संगमनेर जिल्हा अहमदनगर येथील रहिवाशी होते. गोपाळराव पोस्ट ऑफिसात कर्मचारी होते. ते उच्च विचारांचे होते. आनंदी बाईंच्या शिक्षणात त्यांचे योगदान अतिशय महत्वपूर्ण होते.

### या घटनेने आनंदीबाईंना बनवले डॉक्टर :-

विवाहानंर वयाच्या १४ व्या वर्षी आई होण्याचे सौभाग्य त्यांना प्राप्त झाले. त्या काळात डॉक्टर पुरुष असल्याने स्त्रियांना आपल्याला होणाऱ्या त्रासाबद्दल त्यांच्याशी मनमोकळेपणाने बोलता येत नसे. त्यांची घुसमट होत असे. अशातच आनंदीबाईंनी एका मुलाला जन्म दिला. परंतू दुदैवाने अवघ्या दहा दिवसातच उपचारांच्या अभावी त्यांच्या बाळाचा मृत्यू झाला.

बाळाच्या मृत्यूचा आनंदीबाईना जोरादार धक्का बसला. या घटनेने त्यांना हादरवून सोडले . महिलांच्या आणि बालकांच्या उपचाराबद्दल त्या विचार करु लागल्या. वैद्यकीय क्षेत्रात त्यांची रुची वाढू लागली व त्यांनी शिक्षण घेवून डॉक्टर होण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी भारतात ॲलोपॅथीक डॉक्टरीच्या अभ्यासक्रमाची कोणतीही सुविधा उपलब्ध नव्हती आणि म्हणून वैद्यकीय शिक्षण घेण्याकरिता त्यांना विदेशात जावे लागले आनंदीबाईच्या या निर्णयाचे गोपाळरावांनी पूर्ण समर्थन केले आणि त्यांच्या बाजूने उभे राहिले.

### आनंदीबाईंच्या शिक्षणास प्रारंभ :-

गोपाळराव स्वतः लोकहितवादी ची शतपत्रे वाचत. आपल्या पत्नीला शिक्षणात रस आहे हे गोपाळरावांनी जाणले होते. लोकहितवादीच्या शतपत्रातून ते प्रेरित झाले आणि आपल्या पत्नीस इंग्रजी शिकविण्याचा निश्चय केला. गोपाळराव पोस्ट ऑफीसात कारकून होते. गोपाळरावांची सतत बदली होत असे. जिथे बदली होईल तिथे आनंदीबाई ही गोपाळरावांबरोबर जात राहिल्या व गोपाळराव आनंदीबाईंना शिकवित राहिले.

गोपाळरावांनी आनंदीबाईंना मिशनरी शाळांमध्ये प्रवेश मिळावा म्हणून खूप प्रयत्न केले. कलकत्याला बदली झाल्यावर तिथे आनंदीबाईंनी संस्कृत आणि इंग्रजी वाचने आणि बोलणे शिकले . गोपाळराव एक पुरोगामी विचारवंत होते. त्या काळातही त्यांचा महिला शिक्षणाला पाठिंबा होता. त्या काळातील इतर पती आपल्या पत्नीने स्वयंपाक न केल्याबद्दल मारहाण करत याउलट गोपाळराव हे आपल्या पत्नीला अभ्यास न केल्याबद्दल मारहाण करत असत. कारण पत्नीने वैद्यकीय शिक्षण घेवून डॉक्टर व्हावे असा त्यांचा आग्रह होता.

### अमेरिकेला शिक्षणासाठी जातानाआलेले अडथळे -

कोल्हापूरमध्ये मिशनऱ्यांशी ओळख वाढल्यावर गोपाळरावांच्या मनात आलं की, आनंदीला अमेरिकेला पाठवून तिच शिक्षण करावं. आनंदीबाईंना अमेरिकेला शिकायला जाण्यासाठी पैशाची तरतूद & सोबतीला कोणी शोधण्यात २ - ४ वर्षे गेली. आनंदीबाईंना समाजाचे, शेजा-या - पाजा-यांचे विपरीत अनुभव आले. त्या गोपाळरावांबरोबर फिरायला जातात, इंग्रजी शिक्षण घेतात याबद्दल कुतूहल म्हणून त्या दोघांना पहायला लोक गर्दी करीत. नको नको ते बोलत असत. आनंदीबाईंनाही खूप अपमानास्पद शेरे ऐकावे लागत परंतू तिकडे दुर्लक्ष करुन आनंदीबाई आपला अभ्यास निष्ठेने करत.

त्या काळात महिलांना शिक्षणाची परवानगी नव्हती त्यामुळे आनंदीबाईना समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागले रुढी परंपरांना महत्व देणारा समाज आनंदीबाईंच्या निर्णयाच्या विरोधात उभा राहिला एक विवाहित महिला विदेशात जावून वैद्यकीय शिक्षण घेणार हे समाजाला मान्य नव्हते. आनंदी & गोपाळराव विदेशात जावून धर्मांतर करतील अशी समाजातील लोकांना भिती होती . आनंदीबाईंना जेंव्हा या गोष्टी समजल्या तेंव्हा त्यांनी श्रीरामपूर येथील महाविद्यालयात लोकांना एकत्र केले व एक भाषण केले व या भाषणात आपण अमेरिकेला का जातोय हे स्पष्ट सांगितले.

### अमेरिकेला जाण्यपुर्वीचे भाषण :-

अमेरिकेला जाण्यापुर्वी श्रीरामपूर (बंगाल) येथील बॅप्टिस्ट कॉलेजच्या सभागृहात आनंदीबाई जोशी यांनी मी अमेरिकेला का जाते ? यावरती अस्खलित इंग्रजीत व्याख्यान दिलं. मुळातून हे भाषण वाचण्यासारखं आहे. त्यातला एक मुद्दा असा, पृथ्वीच्या पाठीवर हिदुस्थान इतका रानटी देश दुसरा नाही. देशातील लोकांना आपल्या गरजा पूर्ण करता येत नाहीत.वैद्यकीय शास्त्रज्ञ स्त्रियांची हिदुस्थानातल्या प्रत्येक भागात अतिशय गरज आहे. सभ्य स्त्रिया पुरुष वैद्याकडून चिकित्सा करुन घेण्यास तयार नसतात. इथे स्त्री डॉक्टरची किती गरज आहे. हे ओळखून आनंदीबाईनी अमेरिकेला जाण्याचा निर्णय घेतला होता. या भाषणात त्यांनी भारतात महिला डॉक्टरची किती आवश्यकता आहे हे पटवून दिले आणि स्पष्ट सांगितले मला यासाठी धर्मांतर करण्याची काही गरज नाही मी माझा हिंदू धर्म व संस्कृती कधीही सोडणार नाही, त्यागणार नाही मला माझे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर भारतात येवून महिलांसाठी एक वैद्यकीय महाविद्यालय सुरु करायचे आहे.

आनंदीबाईचे हे भाषण लोकांना खूप आवडले त्यामुळे त्यांना होणारा विरोध तर कमी झालाच पण त्यांना या कार्यात हातभार म्हणून संबंध भारतातून आर्थिक मदत जमा झाली. भारताच्या तत्कालीन व्हाइसरॉय नी २०० रुपयांचा फंड जाहिर केला आनंदीबाई धर्मपरिवर्तन करणार नाहीत किंवा विदेशात नौकरी करणार नाहीत हे लोकांना कळाल्यानंतर सर्वांनी त्यांच्या निर्णयाला पाठिंबा दिला.

**अमेरिकेतील प्रवास :-**

आनंदीबाईंच्या वैद्यकीय शिक्षणासाठी गोपाळरावांनी अमेरिकेत काही पत्र व्यवहार केला. परंतू हे शिक्षण घेण्यासाठी ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याची अट होती आणि धर्मांतर करणे तर त्यांना मान्य नव्हते . मात्र त्यांनी प्रयत्न सोडले नाहीत. पुढे आनंदीबाईंची तळमळ आणि गोपाळरावांची चिकाटी याचे फलित म्हणजे आनंदीबाईंना ख्रिस्ती धर्म न स्वीकारता १८८३ मध्ये वयाच्या १९ व्या वर्षी विमेन्स मेडिकल कॉलेज ऑफ पेन्सिल्व्हानिया मध्ये प्रवेश मिळाला. अमेरिकेला जाताना एका अमेरिका बाईंच्या सोबतीने एकटीने दोन महिन्यांचा बोटीने प्रवास केला त्यात त्या शाकाहारी आणि साडी हाच पोशाख . बोटीवर त्यांची उपासमार झाली. त्या आजारी पडल्या, पण पुढेही चार वर्षे त्यांची उपासमारच झ ाली. भारतीय पध्दतीच अन्न मिळालं नाही. परदेशी कपडे वापरायचे नाहीत म्हणून त्या साडी नेसुन त्यावर जाकीट घालत असत. तिथली बर्फाळ थंडी त्यांच शरीर चिरत राहिली. त्यात अभ्यास, स्वतःचा स्वयंपाक, समाज, नातलग यांनी दिलेली दुषण सहन करीत इच्छित कार्य करीत त्या राहत असत. तिथला समाजाही आनंदी बाईंशी कुत्सितपणे वागत होता.

तिथेही कार्पेंटरबाई आणि कॉलेजच्या प्रिन्सिपॉल इ. चांगल्या स्त्रिया भेटल्या परंतू अन्य बऱ्याच जणांनी त्रास दिला आणि जिच्या सोबतीनं आनंदीबाई चालल्या होत्या तिचंही वागण ठीक नव्हते. याचा त्यांच्या मनावर परिणाम होत होता तो शरिरावरही झाला सतत अर्धपोटी राहिल्याने आजारपण तिच्या पाठी लागली. भारतातील लोक म्हणत आनंदी आता ख्रिस्ती होवूनच येईल तर अमेरिकेतल्या तिच्या सहवासात येणाऱ्या मिशनरीज तिला 'ख्रिस्ती हो' असा उपदेश करीत असत.

अमेरिकेत गेल्यानंतर तेथील नवीन वातावरण आणि प्रवासातील दगदग यामूळे आनंदीबाईंची प्रकृती खूप ढासळली होती. पंरतू अमेरिकेतील कार्पेटर जोडप्याची खूप मदत त्यांना मिळाली. त्यांच्याच आधारावर आनंदीबाईंनी अमेरिकेत पाऊल टाकल . या कार्पेटरबाई आनंदीला 'आनंदाचा झरा' म्हणत.

कष्टाच्या आणि जिद्दीच्या जोरावर अभ्यासक्रम पूर्ण करुन मार्च इ. स. १८८६ मध्ये आनंदीबाईंना एम. डी. ची पदवी मिळाली. एम. डी. साठी त्यांनी जो प्रबंध सादर केला. त्याचा विषय होता 'हिंदू आर्य लोकांमधील प्रसुतिशास्त्र' एम. डी झाल्यावर व्हिक्टोरिया राणीकडून सुध्दा त्यांचे अभिनंदन झाले हा खडतर प्रवास करताना गोपाळरावांचा त्यांना पाठिंबा होता. पदवीदान समारंभाला गोपाळराव आणि पंडिता रमाबाई हेउपस्थित होते. भारतातील पहिली स्त्री डॉक्टर म्हणून सर्व उपस्थितांनी उभे राहून जोरदार टाळया वाजवून आनंदीबाईंची प्रशंसा केली .

**भारतात परतल्यानंतर :-**

१६ नोव्हेंबर १८८६ या दिवशी आनंदीबाई भारतात परतल्या तेंव्हा मुंबई बंदरावर लोकांनी गर्दी केली. त्यांचे पुष्प वृष्टीने स्वागत केले. त्या आजारी होत्या. परंतू हिदुस्थानात घरी जायला मिळणार, घरचं अन्न मिळणार म्हणून त्यांची प्रकृती तात्पुरती स्थिर होती. आनंदीबाईंना अभिनंदनाच्या तारा आल्या . मानपत्रे पाठवली गेली. मानपत्रात उच्चशिक्षणाचा गौरव केला गेला. त्यांना कोल्हापूरमधील अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल मधील स्त्री कक्षाचा ताबा देण्यात आला. त्या रुग्णांची सेवा करु लागल्या .

**पोषाख :-**

स्वदेश, स्वपोषाख, स्वदेशी खाण, पूर्णपणे महाराष्ट्रीय पध्दतीच आचरण आनंदीबाईचे असे. त्याचा त्यांनी कधीच त्याग केला नाही . आज जे आनंदीबाईच छायाचित्र सर्वत्र प्रसिध्द केले जाते ते म्हणजे गुजराथी पध्दतीने नेसलेली साडी आणि दागिने घातलेल चित्र त्याबद्दल स्वतः आनंदीबाईने लिहिल आहे की, इथल्या हवेत वारंवार फरक होत राहता. नऊवारी साडी नेसल्याने पाय थोडे उघडे पडतात त्याकरिता गुजराती पोषाख असल्याने डोक्याशिवाय सर्व शरीर झाकले जाते.

जेव्हा आनंदीबाई भारतात परतल्या . मुंबई बंदरात बोटीतून उतरण्यापुर्वीच त्यांच्या पोषाखाच वर्णन केलेले आहे. नारायणपेटी काळी चंद्रकळा (नऊवारी) खणाची चोळी, कपाळावर कुंकू, नाकात नथ, कानात कुंडी, पायात बुट व स्टॅकिग्ज असा होता.

पारंपारिक साडी, नाकात नथ आणि हातात वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र अभिमानाने दाखवणाऱ्या आनंदीबाईचे हे चित्र त्यांच वेगळेपण सिध्द करणारे आहे.

**मृत्यू :-**

परदेशात वैद्यकीय शिक्षण पुर्ण करुन त्या भारतीय महिलांची सेवा करण्यासाठी मायदेशी परतल्या खऱ्या परंतू बदलते हवामान, बोटीचा प्रवास या सगळयांचा परिणाम म्हणून त्यांना क्षयरोगानं ग्रासलं. भारतात आल्यावर त्यांच्या आजाराने पुन्हा डोकं वर काढल. परंतु सम्रुद्रोल्लंघन करुन आलेली, त्यातून स्त्री म्हणून भारतातील वैदय आणि डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार केले नाहीत. आणि अशातच २६ फेब्रुवारी १८८७ रोजी आनंदीबाई जोशी यांचे निधन झाले.

**विशेष :-**

- भारतातील पहिल्या महिला डॉक्टर .
- २६ फेब्रुवारी हा दिवस दरवर्षी महिला आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो.
- भारताच्या पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांना त्यांच्या १५३ व्या जयंतीनिमित्त गुगलने खास डूडलव्दारे अभिवादन केले आहे.
- अमेरिकेत कार्पेटर कुटूबियांनी आपल्या कुटूंबाच्या स्मशानात लहानसे थडगे बांधले. त्यावर आनंदी जोशी एक ब्राम्हण कन्या परदेशात शिक्षण घेवून डॉक्टर पदवी मिळवणारी पहिली भारतीय स्त्री अशी अक्षरे कोरुन तिचे स्मारक केले.
- अमेरिकेच्या त्यांच्या मेडिकल कॉलेजने ३१ मार्च १८८६ रोजी फिलोडल्फियाला आनंदीबाईंना 'वैद्य विद्यापारंगत' हा किताब दिला.
- राम जोगळेकर यांनी आनंदी गोपाळ हे नाटक लिहिले आहे.
- आनंदीबाई जोशी यांच्या संघर्ष गाथेवर अंजली कीर्तने यांनी एक डॉक्युड्रामा तयार केला आहे. या लघुपटाला महाराष्ट्राला सरकारचा सर्वोत्कृष्ट लघूपटाचा पुरस्कार मिळाला आहे.
- इंस्टिटयुट फॉर रिसर्च ॲण्ड डॉक्सुमेटेशन इन सोशल सायन्स आणि लखनौ येथील एका गैर सरकारी संस्थेने वैद्यकीय क्षेत्रात आनंदीबाई जोशी सन्मान देण्यास सुरुवात केली.
- महाराष्ट्र शासनाने आनंदीबाई जोशींच्या नावाने तरुण महिलांकरिता एक फेलोशिप प्रोग्राम ची सुरुवात करत त्यांना विशेष सन्मान दिला.
- आनंदीबाई यांच्या जीवनाचा आढावा घेणारा आनंदी गोपाळ हा मराठी चित्रपट फेब्रुवारी २०१९ मध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाला १८ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या मराठी विभागात पहिला पुरस्कार मिळाला आहे.

**सारांशलेखन :-**

आनंदीबाई जोशी यांच्या धाडस, जिद्द आणि चिकाटीची हि गाथा आहे. केवळ २१ वर्षाच्या जीवनयात्रेत आनंदीबाईंनी भारतीय स्त्रियांसाठी प्रेरणादायी जीवनादर्श उभा केला. दुर्देवाने आनंदीबाईच्या बुध्दिमत्तेचा आणि ज्ञानाचा फायदा जनतेला होवू शकला नाही. मात्र चूल आणि मुल म्हणजेच आयुष्य असे समजणाऱ्या महिलांना त्या काळात आनंदीबाई जोशी यांनी आदर्श व मानदंड घालून दिला. एकीकडे सावित्रीबाई व जोतीबा स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न करत असतानाच आनंदी - गोपाळ हे जोडपे आपले ध्येय प्राप्त करण्यासाठी झटत होते . जिद्द आणि चिकाटी असेल तर कोणतेही मोठे काम अशक्य नाही हे या जोडप्याने समाजाला सिध्द करुन दाखवले आहे असे म्हणता येईल.

वयाच्या केवळ अठराच्या वर्षी बोटीनं परदेशी जाणारी पहिली स्त्री, हालअपेष्टा सहन करत वैदयकीय शिक्षण पूर्ण करणारी पहिली स्त्री. फक्त भारतातच नव्हे तर परदेशातही कुचेष्टा अवहेलना अपमान सहन करीत हाती घेतलेले कार्य जिद्दीने पूर्ण करणारी स्त्री. भारतीय रितीभाती, आपला शाकाहारी आहार तिथेही सांभाळणारी इंग्रजी भाषा उत्तम आत्मसात करुन वैद्यकीय शिक्षण प्रकृतिअस्वास्थ सांभाळीत पूर्ण करणारी तरुणी. यामुळेच १५० हुन अधिक वर्षे झाली तरी डॉ. आनंदीबाई जोशींची अजूनही वाचकांना,अभ्यासकांना, स्त्रियांना भूरळ पडते आहे.

आनंदीबाई गोपाळ जोशींचे व्यक्तीमत्व खरोखर सर्वांकरिता एक प्रेरणास्त्रोत आहे..!

**निष्कर्ष :-**

१. जिद्द आणि चिकाटी असेल तर आपण कोणतेही कार्य पूर्ण करु शकतो हे आनंदीबाई जोशींच्या कार्यातून समजते.
२. समाजात राहून कार्य करायचे तर अडथळे येणारच परंतू त्यातून मार्ग काढून ध्येय साध्य करु शकतो.
३. आनंदीबाई सारखं कितीही मोठ झाल तरीही आपली संस्कृती आपले संस्कार विसरु नयेत.
४. आपण घेतलेला निर्णय यशस्वी झाल्यानंतर प्रथम विरोध करणारे सुध्दा नंतर आपल्याला पाठिंबा देतात व कौतुक करतात.

**संदर्भग्रंथ :-**

१. कै. सौ. डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र - काशीबाई कानिटकर
२. आनंदी गोपाळ - श्री . ज. जोशी
३. डॉ. आनंदीबाई जोशी : काळ & कर्तृत्व - अंजली कीर्तने
४. इंटरनेट - मराठी सृष्टी : संजीव वेलणकर
- विकि पेडिया
- महाराष्ट्र टाईम्स